महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेसाठी सन २०१८-१९ आर्थिक वर्षातील अखर्चित निधी सन २०१९-२० आर्थिक वर्षात खर्च करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः मफुयो-२०१९/प्र.क्र.१२७/आरोग्य-६

गो.ते. रुग्णालय आवार, १० मजला,
नवीन मंत्रालय, मुंबई - ४०० ००१
दिनांक: १२ जुलै, २०१९

वाचा :-

१) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय, दि. ०६.०६. २००८
२) सा.आ. वि.,शासन निर्णय क्र. रास्वयो-२०१८/प्र.क्र. ७४/आरोग्य-६, दिनांक २१.०९.२०१८
३) सा.आ. वि.,शासन निर्णय क्र. प्रजयो-२०१८/प्र.क्र.२६२/आरोग्य-६, दिनांक १३.११.२०१८
४) सा.आ. वि.,शासन निर्णय क्र. प्रजयो-२०१८/प्र.क्र.२६४/आरोग्य-६, दिनांक २७.०३.२०१९
५) राज्य आरोग्य हमी सोसायटीचे पत्र जा.क्र.राआहसो/कक्ष-२/टे-१/प्रशासकीय मान्यता/५४२६/७३१/२०१९ दिनांक २०.०६.२०१९ व क्र. ७४८/२०१९ दिनांक २४ .०६.२०१९
६) सा.आ. वि.,शासन निर्णय क्र. मफुयो-२०१८/प्र.क्र. ३०३/आरोग्य-६, दिनांक ०३.०७.२०१९
७) राज्य आरोग्य हमी सोसायटीचे पत्र जा.क्र.राआहसो/कक्ष-२/टे-१/प्रशासकीय मान्यता/५४२६/८०१/२०१९ दिनांक १२.०७.२०१९

प्रस्तावना :-

आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना ही महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेसह राज्यामध्ये सुरु करण्याबाबत शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.रास्वयो-२०१८/प्र.क्र.७४/आरोग्य-६, दि. २१.०९.२०१८ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार राज्यात सदर योजना दिनांक २३.०९.२०१८ रोजी पासून अंमलात आली.

२. प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेसाठी (PMJAY) राज्यात राबविण्याच्या अनुषंगाने केंद्र शासनाकडून ठरविण्यात आलेल्या एकूण ८३ लक्ष ७२ हजार इतक्या कुटूंब लाभार्थ्यांसाठी केंद्र शासन हिस्सा ६० टक्के व राज्य शासन हिस्सा ४० टक्के या प्रमाणात निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. सदर योजनेत समाविष्ट लाभार्थ्यांकरिता केंद्र शासनाकडून दि.२३.०९.२०१८ ते दि.३१.१२.२०१८ या कालावधीपर्यंत केंद्र शासनाकडून ६० टक्के हिश्यापोटी रु.९१.५८ कोटी व माहे जानेवारी, २०१९ ते मार्च, २०१९ या कालावधीकरिता रु.८१.०४ कोटी इतका निधी उपलब्ध होणे आवश्यक होते. तथापि या कालावधीपर्यंत राष्ट्रीय आरोग्य अभिकरण यांचेकडून वेळोवेळी पुरेसा निधी उपलब्ध न झाल्याने राज्य शासनाकडून सन २०१८-१९ मधील प्राप्त अनुदानाचा विनियोग करण्यात आला.

३. दरम्यान राष्ट्रीय आरोग्य अभिकरण यांचेकडून राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या इस्क्रो खात्यात खालीलप्रमाणे रक्कमा जमा करण्यात आलेल्या आहेत.

१) दि.२३.०१.२०१९ - रु.१०.०० कोटी
२) दि.१५.०२.२०१९ - रु.५०.०० कोटी
३) दि.०५.०३.२०१९ - रु.७५.०० कोटी
४) दि.१९.०३.२०१९ - रु.३८.७० कोटी
५) दि.२९.०३.२०१९ - रु.८०.०७ कोटी

एकूण रु.२५३.७७ कोटी

४. सदर निधी मार्च, २०१९ अखेर पर्यंत इस्क्रो खात्यातील रकमेचा खर्च न झाल्यास सदर निधी इस्क्रो खात्यामधून काढून घेण्यात (Pull on) येईल असे, केंद्र शासनाच्या सुचना होत्या. तसेच महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेच्या एकूण २,२२,९०,६०९ लाभार्थ्यांच्या विमा संरक्षणाकरिता माहे एप्रिल, २०१९ ते जून, २०१९ या तिमाहीकरिता विमा कंपनीस रु.३५६.३९ कोटी इतका विमा हप्ता दि.३१ मार्च, २०१९ पूर्वी अदा करावयाचा होता. ही बाब लक्षात घेता, केंद्र शासनाकडील प्राप्त निधी परत जाऊ नये, यासाठी केंद्राकडील एकूण प्राप्त निधी रु.२५३.७७ कोटीमधून दि.२९.०३.२०१९ अखेर रु.२१२.६६ कोटी इतक्या रकमेचा व राज्य शासनाकडून प्राप्त अनुदानातून रु.१४३.७३ कोटी रकमेचा धनादेश विमा कंपनीस अदा करण्यात आला. त्यामुळे राज्य शासनाचा रु.२१२.६६ कोटी इतका निधी अखर्चित राहीला.

५. सा.आ. वि. शासन निर्णय दि.१३.११.२०१८ अन्वये लेखाशीर्षास मान्यता देण्यात आली. तद्नंतर पुरक मागणीद्वारे निधी उपलब्ध करुन देण्यात आला. सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पीय तरतूदीमधून प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेच्या ४० टक्के हिश्यापोटी २२१० जी ४४९ या लेखाशिर्षातंर्गत सा.आ. वि. शासन निर्णय क्र. प्रजयो-२०१५/प्र.क्र.२६४/आ-६,दिनांक २७.०३.२०१९ अन्वये रु.४० कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला. त्यामुळे राष्ट्रीय आरोग्य अभिकरणाकडून विमा हप्त्यापोटी एकूण प्राप्त निधीपैकी शिल्लक निधी रु.४१.११ कोटी, प्रशासकीय खर्चापोटी प्राप्त रु.१२.५४ कोटी व राज्य शासनाकडून प्राप्त रु.४० कोटी असे एकूण रु.९३.६५ कोटी इतका निधी राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या इस्क्रो खात्यात शिल्लक आहे.

६. सन २०१९-२० या वर्षात माहे जूलै, २०१९ ते सप्टेंबर, २०१९ या तिमाही कालावधीसाठी ८३,७२,८७० लाभार्थी कुटुंबांच्या विमा संरक्षणाकरिता व प्रशासकीय खर्चापोटी राज्य शासनाच्या ४० टक्के हिश्यापोटी अनुक्रमे रु. ५४.०२ कोटी व रु.९.५६ कोटी असे एकूण रु.६३.५० कोटी इतका निधी इस्क्रो खात्यात जमा करण्यात आला आहे. सदर ४० टक्के हिश्यापोटी रक्कम इस्क्रो खात्यात जमा केल्याशिवाय केंद्र शासन ६० टक्के निधी इस्क्रो खात्यात वितरीत करत नाही. सध्या केंद्र शासनाकडून रु.८१.०४ कोटी इतका ६० टक्के निधी वितरीत केला असून तो राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या इस्क्रो खात्यात जमा करण्यात आला आहे.

७. महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेचे एकूण लाभार्थी २,२२,९०,६०९ मधून प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचे (PMJAY) ८३,७२,८७० लाभार्थी वगळता महात्मा ज्यातिबा फुले जन आरोग्य

योजनेतील १,३९,१७,७३९ इतक्या लाभार्थ्यांचे विमा संरक्षण अबाधित ठेवण्यासाठी दिनांक ०१ जूलै, २०१९ ते ३० सप्टेंबर, २०१९ या कालावधीतील त्रैमासिक विमा हप्त्याची परिगणना खालीलप्रमाणे:-

(रक्कम रुपये)

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेचे लाभार्थी	प्रति कुटुंब, प्रति वर्ष विमा हप्ता	एकूण वार्षिक प्रिमियम	दि. ०१ जूलै, २०१९ ते ३० सप्टेंबर, २०१९ पर्यंतच्या (९२ दिवस) त्रैमासिक कालावधीतील प्रिमियम
१,३९,१७,७३९	रू. ६४०/-	८९०,७३,५२,९६०/-	२२४,५१,४१,०२०/-

८. महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या दोन्ही योजनांकरीता निविदा प्रक्रिया होवून सुधारीत योजना लागू होईपर्यंत किंवा सहा महिने (०१ जुलै २०१९ ते ३१ डिसेंबर २०१९) यापैकी जे आधी होईल त्या कालावधीपर्यंत विद्यमान महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या एकत्रिपणे राबविण्यास प्रति कुटूंब, प्रतिवर्ष रु.६४०/- या विमा हप्ता दराने मुदतवाढ संदर्भाधीन क्र. ०६ अन्वये देण्यात आलेली आहे.

९. शासन निर्णय वित्त विभाग क्र. संकीर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय, दि. ०६ जून, २००८ नुसार प्राधिकरणाकडील आर्थिक वर्षात मुक्त केलेला निधी व अखर्चीत राहीलेला निधी लगतच्या पुढील आर्थिक वर्षअखेरपर्यंत खर्च करण्याची मुभा देण्यात आलेली आहे असे, राज्य आरोग्य हमी सोसायटीने प्रस्तावित केले आहे.

१०. वित्तीय वर्ष २०१९-२० मधील मंजूर अर्थसंकल्पीत निधीतून विमा हप्ता प्रदानासाठी निधी वितरणाची मागणी न करता, सोसायटीकडील सन २०१८-१९ या आर्थिक वर्षातील अखर्चित उपलब्ध असलेल्या निधीमधून दिनांक १ जुलै, २०१९ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०१९ या कालावधीतील विमा हप्ता रु. २२४,५१,४१,०२०/- (अक्षरी रुपये दोनशे चोवीस कोटी, एकावन्न लक्ष एकेचाळीस हजार वीस फक्त) विमा कंपनीस (National Insurance Company Ltd.) अदा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेची अंमलबजावणी राज्य आरोग्य हमी आरोग्य सोसायटीमार्फत होत असल्यामुळे योजनेंतर्गत कुटुंबाचा विमाहप्ता अदा करण्यासाठी सोसायटीकडे सन २०१८-१९ या आर्थिक वर्षातील अखर्चित उपलब्ध असलेल्या निधीतून दिनांक ०१ जुलै, २०१९ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०१९ या कालावधीतील विमा हप्ता रू.२२४,५१,४१,०२०/- (अक्षरी रुपये दोनशे चोवीस कोटी, एकावन्न लक्ष एकेचाळीस हजार वीस फक्त) विमा कंपनीस अदा करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय नियोजन विभागाने अनौ. संदर्भ क्र. १२७/१४७२, दिनांक ०५ .०७.२०१९ तसेच वित्त विभागाने अनौ.संदर्भ क्र.२४२/२०१९/व्यय-१३, दिनांक ११.०७.२०१९ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७१२१६४१५३०७१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Subhash Nivruti Gadge

Digitally signed by Subhash Nivruti Gadge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b1f74930407346db2703eca69fb25a73a3ba8647d94e4c83579e877eeaa6372e, serialNumber=8aa1f531272224e355732cc20c64b2a014c4d982a276b8f3e7048995acbf1651, cn=Subhash Nivruti Gadge
Date: 2019.07.15 11:29:05 +05'30'

सु.नि. गाडगे

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल, लेखा परीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता, मुंबई.
२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
३. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
४. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी, मुंबई
६. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
७. सहसंचालक, (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा संचालनालय, पुणे.
८. प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई. (३प्रती)
९. नियोजन विभाग (कार्यासन१४७२), मंत्रालय, मुंबई
१०.वित्त विभाग, कार्यासन - व्यय -१३/अर्थसंकल्प-९, मंत्रालय, मुंबई-३२.
११.अर्थसंकल्प शाखा, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२.निवड नस्ती.